**February 10, 2026**

To,
**BSE Limited ("BSE")**
Phiroze Jeejeebhoy Towers
Dalal Street,
Mumbai 400 001
BSE Scrip Code: **543712**

To,
**National Stock Exchange of India Limited ("NSE")**
The Listing Department,
Exchange Plaza, Bandra-Kurla Complex,
Bandra (East), Mumbai – 400051
NSE Symbol: **AFSL**

**Subject : Newspaper advertisement regarding the financial results of the Company for the quarter and nine months ended December 31, 2025**

**Ref : Regulation 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015**

Pursuant to Regulation 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed newspaper cuttings of the Unaudited Standalone and Consolidated Financial Results of the Company for the quarter and nine months ended December 31, 2025, published on February 10, 2026, in the following newspapers:

a) Financial Express, English Newspaper;
b) Mumbai Lakshadeep, Marathi Newspaper.

The above information is available on the website of the Company i.e. www.abansfinserv.com

We request you to take the same on record.

**For Abans Financial Services Limited**
**(Formerly known as Abans Holdings Limited)**

Bhargavi Halapeti Digitally signed by Bhargavi Halapeti Date: 2026.02.10 11:54:22 +05'30'

**Bhargavi Halapeti**
**Company Secretary & Compliance Officer**
**Membership No.: ACS 23955**

***Encl: a/a***

**Abans Financial Services Limited**
(Formerly known as Abans Holdings Limited)
**Regd. Office:** 36, 37, 38A, Floor-3, Nariman Bhavan, Backbay Reclamation, Nariman Point, Mumbai-400021.
**CIN:** L74900MH2009PLC231660 **Tel:** +91 22 68170100 **Fax:** 022 61790010
**Email ID:** compliance@abansfinserv.com **Website:** www.abansfinserv.com

# आगामी १८ फेब्रुवारीपासून एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्यांवर कारवाईची शक्यता

छत्रपती संभाजीनगर, दि. ९: प्रत्येक वाहनावर नंबर प्लेट एचआरएसपी लावण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ ही शेवटची तारीख होती. नंबर प्लेट लावण्यासाठी ज्या वाहनधारकांनी नवीन नंबर प्लेट लावण्यासाठी स्लॉट बुक केले होते, अशा वाहनधारकांना जानेवारी महिन्यात नवीन नंबर प्लेट बसविण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. त्याशिवाय १५ दिवसांचा अतिरिक्त वेळ देण्यात आला आहे. यामुळे आगामी १८ फेब्रुवारीपासून एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्यांवर कारवाई होण्याची शक्यता वर्तविण्यात आहे.

केंद्र शासनाने एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याचे आदेश जारी केले. जानेवारी महिन्यात बहुतेक वाहनधारकांनी त्यांच्या वाहनांना नंबर प्लेट लावून घेतली आहे. काही वाहनधारकांना फेब्रुवारी महिन्याची अपॉइंटमेंट मिळाली आहे. यामुळे १५ फेब्रुवारीपर्यंत नवीन नंबर प्लेट

बसविण्याची संधी प्रशासनाकडून देण्यात आली आहे. यानंतर १८ फेब्रुवारीपासून एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनधारकांवर कारवाई करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये दंडात्मक कारवाई होणार असल्याचे सांगण्यात येते.

# मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर धुळ्यानजीक टँकरला आग



धुळे, दि. ९: धुळे शहरापासून जवळ असलेल्या नगाव परिसरात मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावर अचानक एका सिमेंट टँकरला भीषण आग लागल्याची घटना घडली असून या आगीमध्ये टँकर पूर्णतः जळून खाक झाला आहे.

या घटनेमुळे मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक ही काही काळ ठप्प झाली होती. आगीच्या या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र टँकरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.

मुंबई आग्रा महामार्गावरून सिमेंट वाहतूक करण्यात येणारा सिमेंट टँकर हा जात असताना त्याला नगाव परिसरात अचानक आग लागली आणि आगीने काही क्षणातच रौद्ररूप धारण केल्याने सिमेंट टँकर मधून आगे चे मोठे मोठे लागले. चालकाने प्रसंगावधान राखत टँकर हा रस्त्याच्या कडेला उभे केला व स्वतःचा जीव वाचवला.

सदर घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल पोलीस आणि महामार्ग सुरक्षा यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. आणि अग्निशमन दलाच्या पथकाने शर्तीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. मात्र तोपर्यंत सिमेंट टँकर हा पूर्णतः जळून खात झाला होता. आगीच्या या घटनेमुळे राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात धूर पसरल्याने दोन्ही बाजूंनी वाहतो ही ठप्प झाली होती त्यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या मोठी वाहतूक कोंडी देखील यावेळी निर्माण झाली होती.

आगीचं कारण हे अद्याप अस्पष्ट असून तांत्रिक वेगाने शॉर्टसर्किट किंवा इतर कोणत्याही कारणामुळे आग लागली असावी असा प्राथमिक अंदाज हा व्यक्त करण्यात आले आहे. याबाबत पोलीस अग्निशमन विभाग तपास करत आहेत.

# चाकूरमध्ये मतदारावर हल्ला आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

लातूर, दि. ९: चाकूर तालुक्यातील लातूर रोड परिसरात असलेल्या मतदान केंद्राजवळ एका मतदारावर हल्ला करून मारहाण व जिवे मारण्याची धमकी दिल्याची गंभीर घटना मतदानाच्या दिवशी घडली. या प्रकारामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आठ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संग्राम बाबुराव पाटणे (वय ४०, व्यवसाय शेती, रा. लातूर रोड, ता. चाकूर) हे आपल्या चुलतीला मतदान केंद्र क्रमांक १०९, ११० व १११ येथे मतदान कसे करावे, याबाबत मार्गदर्शन करत होते. याच वेळी काही आरोपींनी गैरकायद्याची मंडळी एकत्र जमवून त्यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप आहे. यातील एका व्यक्तीने अंगावर धावून येत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तर इतरांनी संगनमताने शिवीगाळ करत मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

दरम्यान, पुन्हा येथे दिसलास तर तुला जिवंत सोडणार नाही, अशी जिवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. या घटनेनंतर चाकूर पोलीस ठाण्यात आठ आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक बालाजी भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार योगेश मरपल्ले करीत आहेत.

# पाटणा कोर्टाला बॉम्बच्या धमकीमुळे पप्पू यादव यांच्या जामीनावरील सुनावणी पुढे ढकलली

पाटणा, दि. ९: बिहारमधील पूर्णिया येथील अपक्ष खासदार पप्पू यादव यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. पाटणा सिव्हिल कोर्टाला ईमेलद्वारे बॉम्बने धमकी मिळाल्यानंतर खासदार-आमदार न्यायालयासह संपूर्ण न्यायालय परिसर रिकामा करण्यात आला. सुरक्षेच्या कारणास्तव न्यायालयीन कामकाज स्थगित करण्यात आले. ज्यामुळे पप्पू यादव यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी पुढे ढकलण्यात आली आणि ते सध्या बेऊर तुरुंगातच राहतील.

सोमवारी सकाळी पाटणा सिव्हिल कोर्टाला आरडीएक्स आणि आयईडीने उडवून देण्याची धमकी देणारा ईमेल आला. त्यानंतर, पोलीस आणि प्रशासनाला सतर्क करण्यात आले. खबरदारीचा उपाय म्हणून खासदार-आमदार न्यायालय देखील रिकामे करण्यात आले. विविध ठिकाणी शोध मोहीम राबवण्यात आली. ज्यामुळे नियमित न्यायालयीन कामकाजात व्यत्यय आला. परिणामी, पप्पू यादव यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी शक्य झाली नाही.

दरम्यान, पप्पू यादव यांना शुक्रवारी रात्री उशिरा ३१ वर्षे जुन्या प्रकरणात अटक करण्यात आली. NEET विद्यार्थ्याच्या मृत्यूबाबत तो सरकार आणि प्रशासनावर सतत हल्ला करत असताना ही अटक करण्यात आली. सोशल मीडिया आणि सार्वजनिक व्यासपीठांवर त्याने या मुद्यावर वारंवार प्रश्न उपस्थित केले होते. खासदाराच्या अटकेनंतर त्याच्या समर्थनार्थ राजकीय हालचाली तीव्र झाल्या. रविवारी पाटण्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी पप्पू यादवला सोडा अशी मागणी करणारे पोस्टर घेऊन निदर्शने केली. मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे पोस्टरही जाळण्यात आले. पप्पू यादव आणि छएएढ विद्यार्थ्याला न्याय मिळावा यासाठी दिल्लीतील जंतरमंतर येथे निदर्शने करण्यात आली, ज्यामध्ये पीडितेच्या आई आणि कुटुंबानेही भाग घेतला.

# भरधाव कारने ७ तरुणींना चिरडले, चौघींचा मृत्यू

रायबरेली, दि. ९: उत्तरप्रदेशच्या रायबरेली येथील गंगा एक्सप्रेस-वेवर भीषण अपघात झाला. सुलतानपूर जनौलीजवळ रविवारी रात्री मागून आलेल्या भरधाव व अनियंत्रित कारने पायी चालत असलेल्या ७ जणांना चिरडले. या अपघातात ४ तरुणींचा मृत्यू झाला असून ३ जण गंभीर जखमी आहेत.

घटनेची माहिती मिळताच मोठ्या प्रमाणावर नागरिक घटनास्थळी जमा झाले. अपर पोलीस अधीक्षकांनीही घटनास्थळी भेट दिली. नागरिकांच्या गर्दीमुळे जगतपूर-डलमऊ मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. यासंदर्भातील माहितीनुसार जगतपूर कोडर येथील रहिवासी रिया पटेल, प्रिया पटेल, हिमांशी, शालिनी, रश्मी, साधना आणि आसमा हे सर्व चूली गावात आयोजित भंडाऱ्यात सहभागी होण्यासाठी गेले होते. कार्यक्रमानंतर सर्वजण पायी परतत असताना सुलतानपूर जनौलीजवळ गंगा एक्सप्रेस-वेवर मागून आलेल्या भरधाव कारने त्यांना धडक दिली. या अपघातात हिमांशी व शालिनी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. इतर जखमींना तातडीने जगतपूर सीएचसी व जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मात्र जिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान आसमा व रश्मी यांचा मृत्यू झाला. उर्वरित तिघींवर उपचार सुरू आहेत. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, घटनेनंतर सुमारे अर्ध्या तासाने रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचली, मात्र तिचा दरवाजा बराच वेळ उघडला गेला नाही. यामुळे नागरिकांचा संताप झाला.

पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. जखमींच्या नातेवाइकांनी आपत्कालीन सेवांमधील हलगर्जीपणाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

रोज वाचा
दै. 'मुंबई लक्षदीप'

## ABANS
## एबॅन्स फायनान्शिअल सर्व्हिसेस लिमिटेड

(पूर्वीची एबॅन्स होल्डिंग्ज् लिमिटेड म्हणून ज्ञात)
सीआयएन : L74900MH2009PLC231660
नोंदणीकृत कार्यालय : ३६,३७, ३८ए, ३ रा मजला, नरिमन भवन, बॅकबे रेक्लेमेशन, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.
दूर. क्र. : +९१ ०२२ ६१७९०००० | वेबसाइट : www.abansfinserv.com | ई-मेल : compliance@abansfinserv.com

**दि. ३१.१२.२०२५ रोजी संपलेली तिमाही व नऊमाहीकरिताच्या एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा सारांश**

(रु. लाखांमध्ये, उत्पन्न प्रतिशेअर वगळता)

| तपशील | तिमाहीअखेर | | नऊमाहीअखेर | वर्षअखेर |
|---|---|---|---|---|
| | ३१.१२.२०२५ | ३१.१२.२०२४ | ३१.१२.२०२५ | ३१.०३.२०२५ |
| | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) |
| परिचालनातून एकूण महसूल | ६,४९,४६१.४४ | १,२८,०१४.१८ | १५,१६,५२९.०७ | ३,२८,०६८.१७ |
| कालावधीकरिता निव्वळ नफा/ (तोटा) (कर, अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबींपूर्व) | ३,५८३.२५ | ३,५२४.९८ | ११,६५१.७० | १३,२३५.१० |
| करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपश्चात) | ३,५८३.२५ | ३,५२४.९८ | ११,६५१.७० | १३,२३५.१० |
| करपश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपश्चात) | ३,४३१.०३ | २,६९१.६१ | १०,८८४.९२ | १०,८५१.०६ |
| कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता (करपश्चात) नफा/(तोटा) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) यांचा समावेश) | ४,१६३.८१ | ४,०२०.४१ | १४,१८८.६६ | ११,८१४.३२ |
| प्रदानित समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. २/- प्रतिशेअर) | १,०१३.१८ | १,०११.२३ | १,०१३.१८ | १,०११.५२ |
| राखीव (गत वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार पुनर्मूल्यांकन राखीव वगळता) (अ-नियंत्रित व्याजाचा समावेश | - | - | - | १,०६,३९४.५० |
| उत्पन्न प्रतिशेअर (प्रत्येकी रु. २/-) (अखंडित व खंडित परिचालनाकरिता) | | | | |
| १. मूलभूत (रु.) | ६.७८ | ५.३६ | २१.५१ | २१.५६ |
| २. सौम्यीकृत (रु.) | ६.७८ | ५.३१ | २१.५१ | २१.४४ |

टीपा :

१) दि. ३१.१२.२०२५ रोजी संपलेली तिमाही व नऊमाहीकरिताच्या वरील एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचे लेखापरीक्षण समितीद्वारे पुनरावलोकन करण्यात आले असून संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. ०९.०२.२०२६ रोजी आयोजित सभेमध्ये मंजुरी देण्यात आली आहे.

२) ३१ डिसेंबर, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीत, नवीन कामगार संहिता जारी झाल्यामुळे, समूहाने काही अंदाजे आणि गृहितकांवर आधारित कर्मचारी लाभ दायित्वासाठी आवश्यक तरतूद केली आहे. सहाय्यक नियम आणि काही महत्त्वाचे स्पष्टीकरण अपेक्षित आहेत, आणि त्यांचे अर्थ लावले जात आहेत व उद्योगातील पद्धती अजूनही विकसित होत आहेत. वरील परिणामांचे अंदाज अंतिम नियम, उद्योगातील पद्धती आणि कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये वेळोवेळी होणाऱ्या कोणत्याही सुधारणांवर आधारित पुन्हा तपासले जातील आणि अंतिम केले जातील.

३) स्थायी आधारावरील परिचालनातून महसूल, करपूर्व नफा/(तोटा) व कालावधीकरिताचा नफा/(तोटा) खालीलप्रमाणे दिलेला आहे: (रु. लाखांमध्ये)

| तपशील | तिमाहीअखेर | | नऊमाहीअखेर | वर्षअखेर |
|---|---|---|---|---|
| | ३१.१२.२०२५ | ३१.१२.२०२४ | ३१.१२.२०२५ | ३१.०३.२०२५ |
| | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) |
| परिचालनातून एकूण महसूल | ८७६.५२ | २,०९४.६३ | १,०८५.२१ | ३,०७४.७९ |
| करपूर्व नफा /(तोटा) | ६८३.६७ | १,८८२.९८ | ३५९.५८ | २,००६.५७ |
| करपश्चात नफा/(तोटा) | ५९२.३३ | १,४०७.०७ | ३४४.३३ | १,४९७.१० |
| कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न | ६०५.९७ | १,४०७.०७ | ३५८.४६ | १,४९६.३६ |

४) सदर एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष हे कंपन्या कायदा, २०१३ च्या अनुच्छेद १३३ अंतर्गत विहित भारतीय लेखा मानके ३४ - अंतरिम वित्तीय नोंदींमध्ये (आयएनडी एएस ३४) विहित मान्यता व गणन धोरणे सहवाचन त्याअंतर्गत जारी संबंधित नियम तसेच भारतात सर्वसाधारणपणे स्वीकृत अन्य लेखा धारणे तसेच सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ चे विनियमन ३३ च्याआवश्यकता, सुधारित केल्यानुसार, यांअंतर्गत तयार करण्यात आले आहेत.

५) वरील विवरण हे सेबी (सूची व अन्य विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे सादर करण्यात आलेल्या तिमाहीअखेरच्या वित्तीय निष्कर्षांच्या (स्थायी व एकत्रित) विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाइट्स अर्थात बीएसई लिमिटेडची वेबसाइट www.bseindia.com वर व नॅशनल स्टॉकएक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाइट www.nseindia.com वर तसेच कंपनीची वेबसाइट www.abansfinserv.com वरही उपलब्ध आहे. खालील दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून ते प्राप्त करता येऊ शकतील.

एबॅन्स फायनान्शिअल सर्व्हिसेस लिमिटेड करिता
(पूर्वीची एबॅन्स होल्डिंग्ज् लिमिटेड म्हणून ज्ञात)
सही/-
निर्भय वस्सा
(पूर्णवेळ संचालक व मुख्य वित्तीय अधिकारी)
डीआयएन : ०८०११८५३

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०९.०२.२०२६

# सार्वजनिक सुव्यवस्थेला गंभीर धोका ठरलेल्या सराईत गुन्हेगारांविरुद्ध कारवाई

लातूर, दि. ९: लातूर शहर व परिसरात सार्वजनिक सुव्यवस्था, शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्याच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन व पोलीस दलामार्फत महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेटस), वाळू तस्कर, अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे, बेकायदेशीर जुगार व लॉटरी चालवणारे तसेच मानवी अपव्यापार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतचा अधिनियम, १९८१ (सन १९८१ चा क्र.५५) (सुधारणा १९९६, २००९, २०१५ व २०२५) अंतर्गत कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीत तसेच लातूर शहर परिसरात वारंवार बेकायदेशीर, समाजविघातक व दहशत निर्माण करणाऱ्या कृतींमध्ये सक्रिय सहभाग असलेला शाम सुरेश पवार, वय २५ वर्षे, रा. वरवंटी, ता. व जि. लातूर हा सराईत गुन्हेगार सार्वजनिक सुव्यवस्थेस गंभीर धोका ठरत असल्याचे निष्पन्न झाल्याने, पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे मार्गदर्शनात नमूद आरोपी विरुद्ध एम पी डी ए चा सविस्तर प्रस्ताव तयार करून जिल्हादंडाधिकारी, लातूर यांच्याकडे पाठविण्यात आला होता त्यावर जिल्हाधिकारी वर्षा-ठाकूर घुगे यांनी सदर इसमास एमपीडीए अधिनियम, १९८१ च्या कलम ३(१) व ३(२) अन्वये एक वर्षाच्या कालावधीसाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश दिनांक ०५/०२/२०२६ रोजी निर्गमित केले आहेत.एमआयडीसी पोलीस ठाण्याने त्यांच्या प्रस्तावामधील सदर इसमाविरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यांची सविस्तर माहिती, त्याची सातत्यपूर्ण गुन्हेगारी पार्श्वभूमी, त्याच्या कृतीमुळे निर्माण झालेली सार्वजनिक भीती, कायदा व सुव्यवस्थेवर झालेला प्रतिकूल परिणाम, तसेच साक्षीदारांच्या जबाब व गोपनीय अहवाल यांचे जिल्हादंडाधिकारी, लातूर यांच्याकडून बारकाईने परीक्षण करण्यात आले. या परीक्षणाअंती असे समाधानकारकपणे निष्पन्न झाले की, सदर इसमाचे कृत्य हे केवळ वैयक्तिक स्वरूपाचे नसून, सार्वजनिक सुव्यवस्था भंग करणारे व समाजाच्या शांततेस बाधक आहे.

त्यामुळे सामान्य नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या संरक्षणासाठी व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी त्यास प्रतिबंधात्मक स्वरूपात स्थानबद्ध करणे अत्यावश्यक आहे. त्याअनुषंगाने, गृह विभाग (विशेष), महाराष्ट्र शासनाने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, जिल्हादंडाधिकारी, लातूर यांनी एमपीडीए अधिनियमाच्या कलम १३ मधील तरतुदीनुसार सदर इसमास एक वर्षाच्या कालावधीसाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले आहेत.सदर स्थानबद्धतेच्या अनुषंगाने आवश्यक असलेले स्थानबद्धता आदेश, सुपूर्तता आदेश, स्थानबद्धतेबाबतचे आधारभूत मुद्दे, पोलीस अहवाल, तसेच इतर संबंधित कागदपत्रांच्या प्रती एमपीडीए अधिनियमाच्या कलम ३(३) नुसार शासन मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या आहेत.

**जाहीर नोटीस** अ‍ॅड. एच.आर. गोळे

भिवंडी येथील मे दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांचे न्यायालयात

व्यवसायिक दिवाणी दावा नं.०४/२०२३
निशाणी क. 16

ब्लुम इंडीया प्रा. लि. ................वादी
विरूध्द
रेनायसन्स इंडस इन्फ्रा प्रा.लि.प्रति, ................प्रतिवादी
प्रति,
रेनायसन्स इंडस इन्फ्रा प्रा.लि.
अे प्रा. लिमीटेड कंपनी,
पत्ता-६०१, ६ वा माळा, हबटाऊन सोलारिस,
साईवाडी, अेन.एस. फडके रोड, अंधेरी पुर्व, मुंबई नं. ४०००६९ ...... प्रतिवादी

ज्याअर्थी तुम्हांसा नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वादी यांनी तुमच्या विरुध्द या न्यायालयात मौजे वाशेरे, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील जमिन व्यवसायीक गाळा नं.००६,००७,००८,००९,०१०,०११ क्षेत्र १,०६,१७४ चौरस फुट बिल्डीग नं. डब्ल्युइ-व्ही मधील रेनायसन्स इंडस्ट्रीयल स्मार्ट सिटी स. नं. १३/८, २०/४/१, २०/४/२, २०/५, ३७/९, ३७/१४/१, ३७/१४/२, ३०/२०/१ वरील व्यवसायीक युनिटच्या वसुलीकरीता आणि निरंतरच्या हुकूमा करीता दावा दिला आहे.

त्याअर्थी सदर दाव्या संबंधी तुमचे म्हणणे देण्या करीता दिनांक २३-०३-२०२६ रोजी तारीख नेमलेली आहे त्याकरीता तुम्ही स्वतः अगर तुमचे वकीला मार्फत सदर दाव्याचे कामी दिनांक २३-०३-२०२६ रोजी सकाळी ११. ०० वा. या न्यायालयात हजर हावे अन्यथा तुम्हास काही म्हणणे देणे नाही असे समजुन एकतर्फी सुनावणी घेऊन निकाल देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०२/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

हुकूमावरुन
सही/- शिक्का सही/-
लिपीक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर, भिवंडी दिवाणी न्यायालय, व स्तर, भिवंडी

# छत्रपती संभाजीनगर विमानतळावरील प्रवासी संख्येत घट

छत्रपती संभाजीनगर, दि. ९: वर्ष २०२५ मध्ये छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून प्रवासी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांनी विविध शहरांसाठी विमान सेवा चालू करून विमान प्रवाशी वाहतूक वाढविण्यासाठी प्रयत्न केले. हे प्रयत्न प्रायोगिक तत्त्वावर राहिले. ही सेवा खंडित करण्यात आली.

याशिवाय मराठवाड्यात नांदेड सह जळगाव विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर या नवीन विमानतळावरील विमान सेवेमुळे छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून जाणाऱ्या प्रवासी संख्येत घट झाली आहे. वर्ष २०२४ च्या तुलनेत वर्ष २०२५ मध्ये एप्रिल ते डिसेंबर या काळात ६१,३०७ प्रवासी संख्या कमी झाली आहे. प्रवासी संख्येतील तूट ही ११.६ टक्के इतकी येत असल्याची माहिती समोर आली आहे.

छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून हैदराबाद, मुंबई, दिल्ली आणि बेंगळुरू या शहरांसाठी विमानाची सुविधा उपलब्ध आहे. एअर इंडिया विमान कंपनीची आतापर्यंत फक्त दिल्लीसाठी विमान सुरू होते. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून एअर इंडियाने मुंबईसाठीही विमान सुरू केले आहे. इंडिगो विमान कंपनीने चिकलठाणा विमानतळावरून गोवा, नागपूर आणि अहमदाबाद या शहरांसाठी विमान सुरू केले होते. ही विमान सेवा अचानक बंद करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर ते गोवा या विमानाला चांगला प्रतिसाद मिळत होता, अशी माहिती समोर आली आहे.

विमान सेवेसाठी लागू करण्यात आलेल्या आचारसंहिता लागू करण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे देशभरात नोव्हेंबर डिसेंबरमध्ये विमाने रद्ध होण्याच्या घटना घडल्या आहेत. या विमाने रद्ध होण्याचा फटका चिकलठाणा विमानतळावरून जाणाऱ्या विमान प्रवाशांना सोसावा लागला आहे. याशिवाय चिकलठाणा विमानतळावरून जाणारे प्रवासी मराठवाड्यातून येतात.

नांदेड येथे गेल्या काही महिन्यांत प्रवासी विमानांची संख्या वाढली आहे. याशिवाय जळगाव हे विमानतळही कार्यान्वित करण्यात आले आहे. या विमानतळावरून मुंबई किंवा अन्य शहरांसाठी विमाने सुरू करण्यात आली आहेत. सदर विमाने ही उड्डाण योजनेअंतर्गत चालविण्यात येत आहेत. विमानतळ कार्यान्वित होण्याचा फटकाही चिकलठाणा विमानतळाला बसला आहे.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**निविदा सूचना**

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां. विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. ब-१ को या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक १०.२.२०२६ ते १७.२.२०२६ पर्यंत देण्यांत येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक १८.२.२०२६ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ.क्र. | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई येथील क्विक रिस्पॉन्स टीम इमारत एक मजल्यावरील अल्युमिनियम ग्रील, एम.एस ग्रील, दरवाजा व खिडकी यांची दुरुस्ती करणे. | ८,४०,६५८/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| २ | एल टी. मार्ग मुंबई येथील एडमिन इमारत सीपी ऑफिस तळमजला येथे फॉल सीलिंग पार्टिशन रंगकाम प्लास्टर व दुरुस्ती करणे. | ८,३३,०२९/- | ८,४००/- | ४ महिने | ब - १ | रु. ५९०/- |
| ३ | एल टी. मार्ग मुंबई येथील सीपी ऑफिस आवार पोलीस क्वार्टर्स ए ब्लॉक रूम नं. ५, १९, २७ येथे प्लास्टर, रंगकाम व दुरूस्ती करणे. | ८,३२,४१३/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ४ | मादाम कामा रोड मुंबई येथील ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग १४ मजला, १९ मजल्यावरील पार्टिशन पॅनलिंग हाय व लो हाइट स्टोरेज युनिट यांची दुरुस्ती करणे. | ८,२७,८८५/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ५ | मादाम कामा रोड मुंबई येथील नवीन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह १ ते ३ मजल्यावर मजल्यावरील फॉल सीलिंग, पार्टिशन रंगकाम पॉलिशिंग दुरुस्ती करणे. | ८,२१,२५९/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ६ | मादाम कामा रोड मुंबई येथील इमारत १ ते २० मजल्यावरील विविध कार्यालय येथे जुने फर्निचर दुरुस्ती करणे. | ८,३४,३३६/- | ८,४००/- | ४ महिने | ब - १ | रु. ५९०/- |
| ७ | जे. जे. स्कूल ऑफ आर्ट आवार मुंबई येथील जुने अप्लाय आर्ट इमारत १ मजल्यावर कॉन्फरन्स टेबल, खुर्ची, सोफा, पार्टिशन दुरुस्तीची कामे करणे. (भाग - १,२,३ ) | ७,२५,४६०/- | ७,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ८ | मादाम कामा रोड मुंबई येथील नवीन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग ८, ९, १०, ११, १३ मजल्यावरील मॅनेजर केबिन, स्टोरेज युनिट, वुडन केबिन, पॅनेलिंग दुरुस्ती करणे. | ८,३३,६८८/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ९ | एल टी. मार्ग मुंबई येथील सीपी ऑफिस आधार मुख्य इमारत १ मजल्यावरील एल अँड ओ ऑफिस येथील जिप्सम बोर्ड फॉल्स सिलिंग व इतर दुरुस्ती करणे. | ८,४२,९२१/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १० | मादाम कामा रोड मुंबई येथील नवीन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग ११ ते २० मजल्यावरील कार्यालयात प्लास्टर, रंगकाम, दुरुस्ती करणे. | ८,२१,७०७/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ११ | मादाम कामा रोड मुंबई येथील नवीन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग तळमजला ते १० मजल्यावरील कार्यालयात प्लास्टर, रंगकाम, दुरुस्ती करणे. | ८,१४,३६६/- | ८,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १२ | सिव्हील डिफेंस ट्रेनिंग सेंटर मुंबई येथे वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. | ३,७३,०७०/- | ८,३००/- | १२ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १३ | मादाम कामा रोड मुंबई येथील नवीन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग १५ ते २० मजल्यावरील मॅनेजर केबिन, स्टोरेज युनिट, वुडन केबिन, पॅनेलिंग दुरुस्ती करणे. | ८,२७,६५२/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १४ | मादाम कामा रोड मुंबई येथील नवीन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग ३, ४, ५ मजल्यावरील कार्यालयात प्लास्टर, रंगकाम, दुरुस्ती करणे. | ८,१९,२६०/- | ८,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १५ | जे. जे. स्कूल ऑफ आर्ट आवार मुंबई येथील जुने अप्लाय आर्ट इमारत १ मजल्यावर कॉन्फरन्स टेबल, खुर्ची, सोफा, पार्टिशन दुरुस्तीची कामे करणे. (भाग ४, ५,६ ) | ७,११,८८०/- | ७,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १६ | एल टी. मार्ग मुंबई येथील सीपी ऑफिस आवार पोलीस क्वार्टर्स ए ब्लॉक रूम नं. १३,१४,१५ येथे प्लास्टर, रंगकाम व दुरुस्ती करणे. | ८,३१,९८६/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १७ | मंत्रालय मुंबई मुख्य इमारत टेरेसवर वॉटरप्रुफिंग ट्रिटमेंटचे काम करणे. | ८,४२,९८३/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १८ | जे. जे. स्कूल ऑफ आर्ट आवार मुंबई येथील जुने अप्लाय आर्ट इमारत १ मजल्यावर कॉन्फरन्स टेबल, खुर्ची, सोफा, पार्टिशन दुरुस्तीची कामे करणे. ( भाग - ७,८,९) | ७,०७,३७१/- | ७,१००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १९ | मंत्रालय मुंबई विस्तार इमारत टेरेसवर वॉटरप्रुफिंग ट्रिटमेंटचे काम करणे. | ८,४३,७२०/- | ८,५००/- | ४ महिने | ब- १ | रु. ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावार सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र. इशवि/निलि/ ८९६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
इलाखा शहर विभाग, २ रा माळा,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दिनांक- ६/२/२०२६

सही/-
(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

प्रतः- उप अभियंता, दक्षिण, पश्चिम, मध्य उप विभाग आणि अधीक्षक आमदार निवास मुंबई यांना माहितीसाठी रवाना.
प्रतः- सुचनाफलक

डीजीआरपीआरः आरओसी-२०२५-२६/क्र. ५/सी५६५५